# <u>21. जार Jar.</u>

मी पाचवीत असतानची ही गोष्ट आहे. मी नुकताच म्युन्सिपल शाळेतून हायस्कुलमध्ये प्रवेश केला होता. एक दिवस आमच्या वर्गशिक्षकांनी वर्गात एक काचेचा जार ( बाटली ) काही टेबल टेनिसचे चेंडू , बारीक काचेच्या गोटया व वाळूची पिशवी आणली. शिपायाने ह्या सर्व वस्तू टेबलावर आणून ठेवल्या. तासाचे सर आले नव्हते म्हणून आमचे वर्गशिक्षकच तास घेण्यासाठी आले होते. सर म्हणाले की तूम्ही ह्या टेबलावर ठेवलेल्या वस्तू बघितल्याच असतील. आज मी तुम्हाला एक कोडे घालणार आहे .

वर्गशिक्षक म्हणाले कि ह्या सर्व वस्तु ह्या जारमध्ये मावल्या पाहिजेत. सर्वांनी ज्या क्रमाने वस्तु बाटलीत भरायचा तो क्रम एक कागदावर लिहून मला द्या. सर्व विद्यार्थींनी चिठ्ठ्या सरांकडे दिल्या. उतरांप्रमाणे सरांनी विद्यार्थींचे गट केले व त्या गटप्रमुखाना आपल्या उतराप्रमाणे प्रयोग करायला सांगितला. तीनही गट असमर्थ ठरले. माझ्या गटाचे मी व माझा मित्र जयंत दोघे गटप्रमुख होतो. आम्ही दोघांनी सर्व वस्तू त्या जारमध्ये भरल्या. सर्वांनी टाळया वाजवून आम्हाला शाबासकी दिली. तेव्हढयात सरांनी एक ग्लास पाणी त्या जारात ओतले. तेव्हढयात तासाची घंटा झाली. शिपाई येऊन तो जार घेऊन गेला. खरेतर विषय इथेच संपला.

जेव्हा मी मोठा झालो , निर्वृतीचे विचार मनात घर करू लागले , आयुष्यात काय कमावले , काय गमावलेचा हिशेब मांडू लागलो तेव्हा ही लहानपणाची गोष्ट आठवली. पण ह्यावेळी ती गोष्ट नवे संदर्भ घेऊन आली होती.

माझ्या मनःशांतिचे , सुखाचे उत्तर त्या जारमध्ये होते. माझे आयुष्य नकळतपणे त्या जारमध्ये मी व जयंतने ज्या क्रमाने वस्तु भरल्या , त्याप्रमाणे गेले होते. अर्थात हे सर्व होण्यासाठी ज्या परिस्थितीत मी लहानाचा मोठा झालो , वडिलांचे संस्कार व त्यांचा काही वर्षाचा तुटपूंजा सहवास कारणीभूत होता.

म्हणूनच ज्या जारचे रहस्य मी तुम्हाला सांगणार आहे. माझी अपेक्षा आहे कि ज्या कोणाला हे रहस्य समजेल त्याने त्याचा अवश्य प्रसार करावा.
आपले आयुष्य हे एका काचेच्या जार सारखे आहे. काच कधी तडकेल याचा नेम नाही तसेच आपल्या आयुष्याचे आहे. असो. विषयांतर नको. तर काय सांगत होतो कि आपले आयुष्य म्हणजे काचेचा जार समजूया. टेबलटेनिसचे चेंडू म्हणजे आपण आयुष्यात जे जे महत्वाचे मिळविले पाहिजे त्याचे प्रतिक समजू या. उ.दा. चांगले शिक्षण , संस्कार , तब्बेत , मित्र , छंद , नातेवाईक , स्वयंशिस्त , आत्मभान / प्रेरणा , नम्रता , सामाजिक बांधिलकी इत्यादी. काचेच्या बारीक गोटया म्हणजे इतर कमी महत्वाच्या गोष्टी. तीच गत वाळूची. त्यापेक्षा कमी महत्वाच्या वस्तु.

ज्या महत्वाच्या गोष्टी वर सांगितलेल्या आहेत त्या मिळवायची सवय लहानपणापासूनच लागली पाहिजे. ह्या सर्वच गोष्टीचा अभ्यास आपल्या क्रमिक पुस्तकांच्या अभ्यासाबरोबर होणे गरजेचे आहे. ह्या सर्व गोष्टी माणसाचे आयुष्य परिपूर्ण व सुखी बनवितात. कर्म हाच आपला देव असतो. यश आपोआपच चालून येते. संपत्ति , पैसा मिळविण्यासाठी वेगळे कष्ट करावे लागत नाहीत किंवा ध्येयही ठेवावे लागत नाही.

पण हल्ली क्रमिक पुस्तकांच्या अभ्यासाला एवढे अवाजवी महत्व दिले जाते की इतर गोष्टींकडे लक्ष देण्यास वेळच उरत नाही. किंबहूना त्याची गरजच नाही असे सुद्धा चित्र मांडले जाते. मग मोठेपणी संध्याछाया भिववििती हृदया अशी वेळ आली की जीवनात आपण काय गमावले याची यादी मोठी झालेली असते.

यश व पैसा ह्या पलिकडे विचारच गेलेला असतो. छंद नसतात , वाचनाची गोडी लागलेली नसते , मित्र दुरावलेले असतात , नातेवाईकही लांब गेलेले असतात , तब्बेत साथ देत नाही. माणुसकीचा गहिवर कधीच आलेला नसतो , नैतिकतेच्या कल्पना विरलेल्या असतात. थोडक्यात माणूस एकाकी झालेला असतो. कुटूंबात राहतो पण स्वतःला शोधत असतो. ईश्र्वर भक्तीतसुद्धा मन रमत नाही.

सर्व टाळायचे असेल तर जारमध्ये योग्य क्रमानेच वस्तु भरणे आवश्यक आहे.

तुम्हाला आठवत असेल की गोष्टीच्या शेवटी सर जारमध्ये पाण्याचा ग्लास उपडा करतात. ह्याचा अर्थ म्हणजे आपण कितीही चांगल्या गोष्टी आत्मसात केल्या तरी आयुष्यात ( जार ) मध्ये जागा असतेच.

फक्त आपल्याला त्याचे भान नसते. जार भरल्यानंतरसुद्धा त्याच्याच पाणी मावले याचाच अर्थ की आपण प्रयत्नपूर्वक जे जे चांगले आहे , मंगल आहे त्यांचा शोध घेतला पाहिजे. आयुष्यभर विद्यार्थी राहण्याचे सुख उपभोगले पाहिजे. चांगल्याचा नुसताच शोध घ्यायचा नाही तर तर ते आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

काय मित्रानो आवडली का जार ची गोष्ट. काय करणार का प्रयत्न ?

**Better Late Than Never.**